




# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे








वर्ष ५ । अंक १५१ । शनिवार २८ फेब्रुवारी २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# नगरमध्ये घरफोडी करणारी नालेगावातील महिला ताब्यात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरात घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यात नालेगावातील एका महिलेला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ताब्यात घेतले आहे. ही महिला सकाळच्या वेळी कचरा गोळा करण्याचे काम करते. तिच्याकडून २८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी आनंद रतीलाल मुथा (रा. नवीपेठ, टायटन शोरुमसमोर. सध्या रा. परदेशी गल्ली, अरिहंत अपार्टमेंट, नगर) यांच्या बंद घराचा कडीकोयंडा तोडून कपाटातील रोख रक्कम व चांदीचे दागिने, पितळी भांडे असा ७३ हजार रुपये किमतीचा ऐवज लांबविण्यात आला होता. दि. १९ रोजी सकाळी साडेअकरा ते दि. २० च्या सकाळी साडेदहा या कालावधीत ही चोरी झाली होती. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार सुनील पवार, शाहीद शेख, गणेश धोत्रे, दीपक घाटकर, फुरकान शेख, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, ज्योती शिंदे यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे दि. २६ रोजी कचरा गोळा करणारी महिला सविता अर्जुन कुचेकर (वय ४२, रा.नालेगाव) हिला ताब्यात घेतले. तिने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली असून, तिच्या ताब्यातून २८ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तिच्या अटकेने कोतवालीत दाखल एका गुन्ह्याचीही उकल झाली आहे.

# जिल्हा प्रधान न्यायाधीशपदी शिवाजी कचरे

## मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश; अकोल्याहून बदली, अंजू शेंडे यांची उच्च न्यायालयात नियुक्ती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्याच्या प्रधान न्यायाधीशपदी शिवाजी भगवंतराव कचरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अकोला येथून त्यांची बदली झाली असून त्यांनी लवकरच पदभार स्वीकारण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मुंबई उच्च न्यायालय यांचे रजिस्टार जनरल स्वप्निल खाटी यांनी २७ फेब्रुवारी रोजी या नियुक्तीचे अधिकृत आदेश निर्गमित केले. न्यायालयीन प्रशासनातील नियमित बदली प्रक्रियेअंतर्गत ही नियुक्ती करण्यात आल्याचे समजते.



अहिल्यानगरचे विद्यमान प्रधान न्यायाधीश तसेच शिर्डी साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीच्या अध्यक्ष अंजू शेंडे यांची नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात बदली झाली आहे. त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर शिवाजी कचरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

■ पान ४ वर

# खुनाची प्रकरणे दडपल्याचे उघड झाल्याने एपीआय गितेंवर निलंबनाची टांगती तलवार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुरुवातीला अरणगाव व आता देऊळगाव सिद्धी येथील खून प्रकरणांना वाचा फुटल्याने नगर तालुका पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या कार्यकाळात ही दोन्ही प्रकरणे दडपण्यात आल्याचा आरोप होत आहे. स्वतः एलसीबीने तपास करून खुनांचे हे सत्य उघडकीस आणल्याने तडकाफडकी बदलीची कारवाई झालेल्या एपीआय गितेंवर आता निलंबनाची टांगती तलवार निर्माण झाली आहे. एकाच महिन्यात उघड झालेल्या या दोन्ही प्रकरणांनी खुनाची प्रकरणे दडपण्यात आल्याच्या आरोपाला पुष्टीच मिळाली आहे.

दि. १९ जानेवारी २०२६ रोजी देऊळगाव सिद्धी (ता. नगर) शिवारात पियुष साखर कारखान्याजवळ संदीप ताराचंद लगड (वय ३२, रा. तांदळी वडगाव, ता. अहिल्यानगर) यांचा पिकअपच्या धडकेत मृत्यू झाला. नातेवाईकांनी मृत्यू संशयास्पद असल्याचे सांगूनही सुरुवातीला अपघात म्हणून नोंद तर नंतर रामदास ताराचंद लगड यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी ऋषिकेश बाळासाहेब घिगे व राजेंद्र रमेश घोंगडे (दोघे रा. वडगाव तांदळी ता. नगर) यांच्याविरूध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला व अटकही केली. मात्र, फिर्यादीच्या नातेवाईकांना हा अपघात नसून, खून असल्याचा संशय होता. नातेवाईकांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे तक्रार केल्यानंतर या चौकशीला नवे वळण मिळाले व एलसीबीच्या तपासात हा अपघात नसून, खून असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे एपीआय गितेंच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण होऊन त्यांची तडकाफडकी राहुरीला बदली करण्यात आली.

यापूर्वी नगर तालुक्यातील अरणगाव येथील मिठू दत्त खून प्रकरणातही असाच प्रकार एपीआय गितेंनी केला होता. मारहाणीत गंभीर दुखापत होऊन

■ पान ४ वर




## दै. आकर्षण निवडक

### श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळा मार्फत सामुहिक हनुमान चालीसा पाठ




अहिल्यानगर - गंज बाजार येथील श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ मार्फत दरवर्षीप्रमाणे यंदाही सामुहिक हनुमान चालीसा पाठ उपक्रमाचा शुभारंभ होळीच्या पवित्र पर्वावर, दिनांक २ मार्च २०२६ रोजी रात्री ९ वाजता करण्यात येणार आहे. या वर्षी मंडळाचे २७ वे वर्ष असून, या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या धार्मिक उपक्रमाची सुरुवात नगर शहरामध्ये प्रथम या मंडळाद्वारे करण्यात आली असून या दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील कार्यक्रम ची सुरुवात नगर शहराचे ग्रामदैवत विशाल गणपती मंदिर येथून करण्यात येणार आहे. मंदिर परिसरात विधिवत पूजा-अर्चा करून सामुहिक हनुमान चालीसा पठणास प्रारंभ होईल. सन २००० पासून मंडळाचे कार्य अखंडपणे सुरू असून, घराघरांत जाऊन हनुमान चालीसा पाठ, पारायण आणि धार्मिक जागृतीचे कार्य सातत्याने करण्यात येत आहे. विश्व शांति, समाजात श्रद्धा, संस्कार आणि एकात्मता वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने सामूहिक कार्यक्रमासाठी सपरिवार व मित्र परिवार सह उपस्थित राहून या पवित्र उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### ऑल इंडिया पोस्टल एससी एसटी वेल्फेअर असोसिएशनची कार्यकारणी जाहीर




अहिल्यानगर- ऑल इंडिया पोस्टल एस सी एस टी वेल्फेअर असोसिएशनचे तिसरे अधिवेशन अहिल्यानगर येथे संपन्न झाले.या अधिवेशना मध्ये पुढील दोन वर्षाकरिता कार्यकारणीची निवड करण्यात आली.दीपक यशवंत नागपुरे यांची अध्यक्षपदी तर विजय चाबुकस्वार यांची सेक्रेटरी पदी नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. इतर कार्यकारणी पुढील प्रमाणे कार्यकारी अध्यक्षपदी अश्विनी चिंतामणी,किरण शिंदे,प्रदीप सूर्यवंशी व दीपक कुंभारे,डेप्युटी सेक्रेटरी अमोल साबळे, खजिनदार महेश सदाफुले,असिस्टंट सेक्रेटरी हर्ष कांबळे,भावना कदम व पूजा सित्ररकर,ज्योती कांबळे ऑर्गनायझेशन सेक्रेटरी,सीमा साळवे असिस्टंट सेक्रेटरी,सुभाष बर्डे,सुरज खंडागळे,बाबासाहेब शितोळे,अजय आगळे,सारिका साळवे,जय मडावी,अर्जुन जटाळे , दीपक भुसारी,संदीप मिसाळ, शैलेश राहींज,अश्विनी फुलकर,राहुल साबळे यांची सर्वांची सर्वानुमते कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आलीअधिवेशना करिता महाराष्ट्र राज्यातून अनेक मान्यवर व सभासद उपस्थित होते अधिवेशनात करिता खा.निलेश लंके उपस्थित होते आपल्या भाषणात त्यांनी पोस्ट कर्मचाऱ्यांच्या समस्या विषयी व सुख सोयी विषयी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले,सभेच्या अध्यक्ष स्थानी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सीनियर पोस्ट मास्तर आदरणीय सुरेश जी बनसोडे होते.

### श्रीमती कुसुम गंगाधर पडोळे

अहिल्यानगर- टिळकरोड, पडोळे चाळ,



अहिल्यानगर येथील रहिवासी श्रीमती कुसुम गंगाधर पडोळे यांचे दि. २७/०२/२०२६ रोजी रात्री ११.२४ वाजता राहत्या घरी अल्प आजाराने निधन झाले. त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्यांचा अंत्यविधी नालेगाव, अमरधाम, अहिल्यानगर येथे झाला. त्या राजू पडोळे, सुनिल पडोळे व वंदना गाडीलकर यांच्या मातोश्री व संजय गाडीलकर (केडगाव) यांच्या सासूबाई होत.

# 'ए आय'च्या युगात बौद्धिक क्षमता वाढविण्याची गरज – प्राचार्य दत्ता नारळे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून जनता विद्यालय रुईछत्तीशी ता. अहिल्यानगर या विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री दत्ता नारळे हे होते.

या कार्यक्रम प्रसंगी डॉ. सी. व्ही. रमण यांच्या जीवन कार्याचा पट विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांमधून विद्यार्थ्यांनी उलगडून दाखवला. विज्ञानाच्या संदर्भातील कोडे, दैनंदिन वापरातील विविध वस्तूंचा कोणकोणत्या शास्त्रज्ञांनी शोध लावला याची उपकरणासहित माहिती विद्यार्थ्यांनी सादर केली. विज्ञान–तंत्रज्ञान आणि आजचे ए आय युग याबद्दल सादर केलेली विज्ञान नाटिका विशेष आकर्षण ठरली.यावेळी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक कवितांचे ही सादरीकरण केले.

विज्ञान शिक्षिका श्रीमती अर्चना लोखंडे यांनी प्राचीन भारतातील वेदांचे शास्त्रीय महत्त्व, प्राचीन ऋषीमुनी पतंजली, सुश्रुत, वराहमिहीर, आर्यभट्ट यांनी लावलेले शोध व आधुनिक विज्ञानाचा अविष्कार याविषयी सविस्तर माहिती दिली. विज्ञान शिक्षक श्री सचिन काळे यांनी भारताचे आधुनिक शास्त्रज्ञ श्री विजय भटकर, स्वामीनाथन, एपीजे अब्दुल कलाम, डॉ. होमी भाभा यांच्या शोधांची माहिती व आधुनिक विज्ञानाचा परिचय करून दिला.

आपल्या मनोगता मधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे प्राचार्य श्री नारळे सर यांनी आधुनिक युगातील मानवासमोर नव्याने विकसित होत असणाऱ्या ए आय तंत्रज्ञानाचे मोठे आवाहन उभे ठाकले असून या तंत्रज्ञानाला पूरक अशी शैक्षणिक पात्रता स्वतःमध्ये निर्माण केल्यास निश्चित प्रगती होईल त्यासाठी अपार मेहनत व कष्ट करण्याची जिद्द आपल्यामध्ये असली पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ तारा पाडळकर, उल्का गुंड, कविता उगले, धनश्री मानकर, श्री दिनकर मुळे, कैलास कोरके, दादासाहेब महानवर इत्यादी उपस्थित होते.

# डॉ. शारदा निर्मळ– महांडुळे यांना राज्य सरकारचा आरोग्य रत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** दुर्वांकुर आयुर्वेद आणि प्रणव हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. शारदा निर्मळ– महांडुळे यांना राज्य सरकारच्या आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभागाकडून वैद्यकीय क्षेत्रात देण्यात येणारा बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंत्रालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर व आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुंबईचे उपमहापौर संजय घाटी यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

डॉ. शारदा निर्मळ – महांडुळे यांनी बीएएमएस व एमएस हे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून स्त्री रोग आणि प्रसूतीशास्त्र तज्ञ म्हणून काम करीत आहेत. आयुर्वेदाच्या माध्यमातून वंध्यत्व निवारण क्षेत्रात यशस्वी पद्धतीने उपचार केले आहेत. राज्यभर विविध शाळा कॉलेजमधून लैंगिक शिक्षण, मासिक पाळीच्या समस्या याबाबत मार्गदर्शन केले आहे. आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार व्हावा, यासाठी त्यांनी अनेक कार्यशाळा घेऊन तसेच दूरदर्शन, वृत्तपत्रामधून स्त्रियांच्या आरोग्यविषयी जनजागृती केली आहे. त्यांच्या संशोधनाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड सह सात विश्वविक्रमामध्ये झाली आहे. दुर्वांकुर आयुर्वेदच्या माध्यमातून संशोधित गर्भिणी प्राश, सूर्यप्राश या चवनप्राशच्या माध्यमातून त्यांनी अनेक वंधत्वाच्या जोडप्यांना संतती सुख दिली आहे. महिलांचे आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, आरोग्य क्षेत्र, स्वनिर्मित औषधे, स्वलिखित आरोग्यविषयक पुस्तके व संशोधनाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड व झाली आहे.

मीरा मेडिकल फाउंडेशन आणि प्रणव हॉस्पिटलचे संस्थापक डॉ. प्रशांत महांडुळे यांच्या डॉ. शारदा पत्नी आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच डॉ. शारदा या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचा आरोग्य क्षेत्रात अत्यंत महत्वाचा समजला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे वैद्यकीय,सामाजिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# मराठी भाषा गौरव दिन उत्साहात; आयएमएसमध्ये उपक्रम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना अभिवादन म्हणून २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांचा जन्मदिवस ''२७ फेब्रुवारी'' हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित केला.

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.सी.डी.आर.) येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करून भाषिक विविधता, सांस्कृतिक वारसा आणि मातृभाषेच्या महत्त्वावर भर देण्यात आला. पद्मभूषण .श्री. विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. संचालक डॉ. एम. बी. मेहता , उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस आणि ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांनी त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. गौरी पाटील (माहिती तंत्रज्ञान विभाग ) यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठीत होते आणि प्रा. गौरी पाटील यांनी अतिशय सुंदरपणे केले होते आणि त्यांनी हा दिवस साजरा करण्याचे मूळ उद्दिष्ट आणि त्याचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी '' लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी –'' हे मराठी गाणे वाजवण्यात आले. निमित्त ज्येष्ठ कवी सुरेश भट यांची ही अजरामर गझल मराठी भाषेचे वैभव आणि समृद्धी व्यक्त करते.

विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा मोठ्या संख्येने सहभाग होता. या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालयाने ''भारतीय ज्ञान प्रणाली'' या विषयावर पुस्तक चिन्हांकन ('बुकमार्क मेकिंग' ) स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत विद्यार्थी आणि कर्मचारी दोघेही सहभागी झाले आणि प्रसंगी प्रत्येक श्रेणीतील तीन विजेते घोषित करण्यात आले. स्पर्धांनाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे परीक्षण श्री.नरेंद्र कदम (अकाऊंटंट, आय.एम.एस) आणि होते डॉ. माया उंडे (बालभारती, पुणे.) यांनी केले .मराठी भाषा गौरव दिनाच्या बुकमार्क मेकिंग स्पर्धेची घोषणा करण्यात आली.विद्यार्थी वर्गात, विजेते: १.श्रेया कानडे, एम.बी.ए ; २.भक्ती चव्हाण, एम.बी.ए ; ३.एम. शरजील इक्बाल, एम.सी.ए. .स्टाफ वर्गात, विजेते: १.प्रा. श्रद्धा .एस. भंडारी, बी.बी.ए; २.डॉ. स्वाती बार्नबस, ग्रंथालय ; ३.प्रा. अश्विनी बराते, बी.सी.ए .सर्व विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि कार्यक्रमात मनापासून सहभागी झाल्याबद्दल सर्व सहभागींचे आभार मानले.

यावेळी ग्रंथालयात पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. ग्रंथालयात प्रदर्शित केलेली पुस्तके अभ्यासक्रमातील होती आणि मातृभाषा दिन साजरा करण्याचा हा एक प्रयत्न होता . पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते..म्हणून हे प्रदर्शन २१–२७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत होते. या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करून भाषिक विविधता, सांस्कृतिक वारसा आणि मातृभाषेच्या महत्त्वावर भर देण्यात आला.कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ.स्वाती बार्नबस, ग्रथालय कर्मचारी श्री.जितिन आढाव, श्री.सिराज मुलाणी, कु.कृष्णा थोरे, श्री.राजेश कांबळे, सौ.रजिया शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला दिनानिमित्त आयएमएससीडसी व इनर व्हील क्लबतर्फे दोन दिवसीय प्रदर्शन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे महिला दिनाच्या निमित्ताने आय एम एस सीडसी व इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांचे भव्य महिला प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. मधुबाला चोरडिया यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

उद्घाटन प्रसंगी त्या म्हणाल्या की, अशा प्रदर्शनांमुळे महिलांना स्वतःच्या व्यवसायाला योग्य व्यासपीठ मिळते. त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन मिळून व्यावसायिक जडणघडणीत अशा उपक्रमांचा मोठा वाटा असतो.

यावेळी आयएमएसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करत त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी आज व उद्या संध्याकाळी ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमास सीडसीच्या समन्वयक डॉ. ऋचा तांदुळवाडकर, प्रा. गौरी पाटील, आयएमएसचे शिक्षकवृंद तसेच इनर व्हील क्लबच्या पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

या प्रदर्शनात २५ हून अधिक स्टॉल्स असून साड्या, दागिने, हँडीक्राफ्ट वस्तू, बेकरी पदार्थ तसेच विविध प्रकारचे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. स्थानिक महिला उद्योजिकांनी आपल्या उत्पादनांचे आकर्षक सादरीकरण केले आहे. हे प्रदर्शन दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी आयएमएस कॅम्पस येथे आयोजित करण्यात आले आहे.महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम परिसरात विशेष आकर्षण ठरत आहे

# मराठी भाषा गौरव दिन निमगाव वाघा येथे उत्साहात

### कविता, निबंध स्पर्धा आणि ग्रंथ प्रदर्शनाने विद्यार्थ्यांत मराठीप्रेमाची जागृती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवनाथ विद्यालय, स्व. पै. किसनराव डोफ्लगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर सार्वजनिक ग्रामीण वाचनालय आणि श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे सादरीकरण करत वातावरण भारावून टाकले. निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिचा इतिहास आणि आजच्या काळातील उपयुक्तता यावर प्रभावी मांडणी केली. विद्यालयात भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य तथा संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता समितीचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, शिक्षकवृंद मंदा साळवे, तृप्ती वाघमारे, शरद भोस, स्वाती इथापे, ग्रंथपाल बाळासाहेब कोतकर, निकिता रासकर–शिंदे, रेखा जरे–पवार, दिपाली ठाणगे, प्रमोद थिटे, तेजस केदारी तसेच श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदिप डोंगरे, आप्पा कदम, प्रशांत जाधव, लहानू जाधव आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या उपक्रमामागे मराठी भाषेचा गौरव वाढवणे, तिचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपणे आणि नव्या पिढीत मराठीविषयी अभिमान व प्रेम निर्माण करणे हा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

मुख्याध्यापक उत्तम कांडेकर म्हणाले की, मराठी ही केवळ भाषा नसून ती आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि विचारांची ओळख आहे. वि. वा. शिरवाडकर यांसारख्या महान साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून मराठीला जागतिक स्तरावर मान मिळवून दिला. विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय जोपासली तरच भाषेची खरी श्रीमंती कळेल. आज आयोजित केलेल्या कविता गायन, निबंध स्पर्धा आणि ग्रंथ प्रदर्शन यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठीबद्दल आत्मीयता निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, मराठी भाषा हा आपला अभिमान आहे. आपल्या पूर्वजांनी जपलेला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे.

# नगर तालुक्यात दहशतीचे सावट; सलग चोरी–दरोडे, जीवघेणे हल्ले

### १० दिवसांत कारवाई नाही तर नगरजामखेड मार्गावर रस्ता रोको– प्रकाश पोटे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नारायणडोह, चिचोंडी पाटील आणि निबोडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून सलग चोरी, दरोडे आणि जीवघेण्या हल्ल्यांच्या घटना घडत असून संपूर्ण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. रात्रीच्या वेळी ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले असून पोलिस यंत्रणेच्या कारवाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांनी संबंधित प्रकरणांची तात्काळ चौकशी करून आरोपींना अटक करावी व परिसरात कडक पोलीस बंदोबस्त लागू करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा नगरजामखेड मार्गावर रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

२१ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री २ ते २.३० वाजण्याच्या सुमारास नारायणडोह येथे शेतकरी पंढरीनाथ मारुती साठे यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घुसून बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्यांच्या पोटात वार करून गंभीर जखमी केले. घरातील ५ ते ६ तोळे सोन्याचे दागिने लुटून चोरटे पसार झाले. जखमी साठे यांच्यावर सध्या अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

त्याच रात्री चिचोंडी पाटील येथे सुदाम पवार व पद्माबाई पवार या वृद्ध दांपत्यावरही चोरट्यांनी हल्ला केला. घरात घुसून दोघांना बांधून ठेवण्यात आले, तोंडात बोळे कोंबून मारहाण करण्यात आली. पद्माबाई पवार यांच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून घरातील सुमारे दीड लाख रुपये रोख रक्कम व ५ ते ६ तोळे सोन्याचे दागिने लुटण्यात आले.

निबोडी गावात काही दिवसांपूर्वी विलास आवारे व अशोक आवारे यांच्या कुटुंबांवरही चोरट्यांनी हल्ला करून प्राणघातक धमक्या दिल्या. विलास आवारे यांच्या कपाळावर वार करण्यात आला असून २ ते ३ तोळे सोन्याचे दागिने चोरीस गेले.

सलग तीन गंभीर घटना घडूनही आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण आहे. अनेक गावांमध्ये रात्री स्वयंप्रेरणेने पहारे सुरू करण्यात आले असून महिलांमध्ये व वृद्धांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

**१० दिवसांचा अल्टिमेटम; रस्ता रोकोचा इशारा**

ग्रामस्थांनी पोलिस प्रशासनाला १० दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या कालावधीत आरोपींना अटक करून सुरक्षा व्यवस्था कडक न केल्यास नगरजामखेड रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रभावी पोलीस संरक्षण नसेल तर स्वसंरक्षणासाठी कायदेशीर शस्त्र परवाने तात्काळ मंजूर करावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### आचार्यश्रींच्या पुण्यस्मृतीदिना निमित्त आनंदधाम येथे खुल्या गायन स्पर्धेचे आयोजन



अहिल्यानगर- राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिना निमित्त प्रबुध्द विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने जैन सोशल फेडरेशनच्यावतीने खुल्या गायन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. दि.१८ व १९ मार्च २०२६ रोजी आनंदधाम येथे ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे मुख्य प्रायोजक विजयकुमार मुनोत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) परिवार आहे. स्पर्धकांनी गुरु महिमा या विषयावर गुरू भक्ती गीते सादर करायची आहेत. वैयक्तिक गायन स्पर्धेसाठी प्राथमिक फेरीतून अंतिम स्पर्धकांची निवड करण्यात येईल. या साठी स्पर्धकांनी आपल्या गाण्याचा करुन संयोजकांकडे पाठवायचा आहे. याची अंतिम फेरी नियोजनाप्रमाने १८ व १९ मार्च रोजी घेण्यात येईल.या स्पर्धेत प्रथम क्रमांकास ३१०० रुपये, व्दितीय क्रमांकास २१०० रुपये व तृतीय क्रमांकास ११०० रुपयांचे रोख बक्षिस दिले जाईल. बुधवार दि.१८ मार्च रोजी खुली समूह गायन स्पर्धा सायंकाळी ७ वाजता होईल. ६ ते १६ वर्षे वयोगटातील स्पर्धक यात सहभागी होवू शकतील. गुरुवार दि.१९ मार्च रोजी १६ वर्षांपुढील वयोगटासाठी खुली समूह गायन स्पर्धा होईल. यात प्रथम क्रमांकास ५१०० रुपये, व्दितीय क्रमांकास ३१०० रुपये, तृतीय क्रमांकास २१०० रुपये रोख बक्षीस दिले जाईल. या स्पर्धेसाठी २०० रुपये प्रवेश फी आहे. या स्पर्धेसाठी ५ मार्च २०२६ पर्यंत नाव नोंदणी करता येईल. समूह गायन स्पर्धेसाठी एका समूहामध्ये किमान ५ स्पर्धक आवश्यक आहेत. वाद्यवृंद सुविधा आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाईल. शुक्रवार दि.२० मार्च रोजी आनंदधाम येथे भक्तीसंध्या कार्यक्रम होणार आहे. . यावेळी गायन स्पर्धेचे बक्षिस वितरण होणार आहे. भक्तीसंध्या प्रस्तुति इंदौर येथील न्यू दिगंबर पब्लिक स्कूल चे विद्यार्थी करणार आहे. स्पर्धे तील सहभाग व अधिक माहितीसाठी संपर्क : सरोज कटारिया (मो.७५८८६९६०७८), सपना कटारिया (मो.८२०८३०१९२८), सीमा मुनोत (मो.९८९००२५८११).

### वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग येथे रविवारी परिचर्या शिक्षण कार्यक्रम



अहिल्यानगर- वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग , अहिल्यानगर यांच्या वतीने आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर व. आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नोंदणीकृत स्टाफ नर्सेससाठी इमरजन्सी नर्सिंग केअर, बेसिक लाईफ सपोर्ट (बीएलएस) व इन्फेक्शन कंट्रोल प्रॅक्टिस. या विषयावर सतत परिचर्या शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग कॅम्पसमध्ये, गणेश नगर, नगर-कल्याण रोड, रेल्वे फ्लायओव्हर ब्रिज जवळ रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ या वेळेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची मान्यता असून सहभागी परिचारिकांना १० क्रेडिट पॉइंट्स प्रदान करण्यात येणार आहेत. हा उपक्रम परिचारिकांच्या कौशल्यवृद्धी व व्यावसायिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यात परिचारीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या आनंदऋषीजी इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अंतर्गत २ वर्षांचा ए.एन.एम. व ३ वर्षांचा जी.एन.एम. कोर्स उपलब्ध आहे. याशिवाय वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग अंतर्गत बीएससी नर्सिंग कोर्स चालू आहे. अधिक माहितीसाठी डॉ. विद्या ठोकळ ७३ ८५५ ० २४ ८४

# सेवाभावी वृत्ती जोपासल्याने कंपनीची प्रगती - नरेश कुमार गवई

**उद्योजक मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांचा अल्ट्राटेक कंपनीतर्फे विशेष सत्कार**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आदित्य बिर्ला समूहाची भारतामधील सर्वात मोठी सिमेंट उत्पादक कंपनी आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाची अग्रगण्य कंपनी असलेल्या अल्ट्राटेक कंपनी सोबत गेल्या तब्बल ३५ वर्षांपासून निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेले में.बी.झेड.सारडा फर्म चे उद्योजक मधुसूदन सारडा तसेच हुंडेकरी ट्रान्सपोर्टचे करीमभाई यांचा विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कंपनीचे नगर जिल्हा मार्केटिंग चे मुख्य नरेश कुमार गवई,पुणे विभागाचे लॉजिस्टिक चे मुख्य निखिल सिंग,तसेच मनोज पाटील,विरेंद्र साबळे,शुचित गुप्ता,पराग जोशी,रामप्रसाद मुथा, स्मिता सारडा आदींसह कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

३५ वर्षांपूर्वी अहिल्यानगर परिसरात कंपनीची विक्री मर्यादित प्रमाणात होती. त्याकाळात उद्योजक मधुसूदन सारडा व करीमभाई हुंडेकरी यांनी चिकाटी,दूरदृष्टी आणि विश्वासार्ह सेवाभाव यांच्या बळावर कामाची भक्कम पायाभरणी केली.त्यांच्या अथक परिश्रमातून १२०डीलर्स व ८०० हून अधिक रिटेलर्सचे मजबूत जाळे उभे राहिले आहे. कंपनीच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना ''कंपनीचे दोन स्ट्राँग खांब'' असा गौरवपूर्ण उल्लेख कंपनीचे अहिल्यानगर भागाचे मुख्य अधिकारी नरेश कुमार गवई यांनी केला.

कंपनीची महिन्याची विक्री विक्रमी टनांपर्यंत पोहोचली.ही उल्लेखनीय कामगिरी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सहकार्य आणि योग्य नियोजन यांच्या पाठबळामुळेच शक्य झाली.अशी कृतज्ञ भावना मधूसुदन सारडा यांनी व्यक्त केली. शहरातील हुंडेकरी लॉन्स येथे अल्ट्राटेक कंपनीच्या सुमारे १५०० डीलर्स व रिटेलर्स यांचा स्नेह मेळावा संपन्न झाला.

उद्योजक करीमभाई यांनी सर्वांना आवाहन केले की, आगामी काळात सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून दरमहा १ लाख मेट्रिक टन विक्रीचा टप्पा गाठण्याचा संकल्प करूया. कंपनीचे उच्च दर्जाचे सिमेंट धरणे, महामार्ग,मोठे पायाभूत प्रकल्प, नामांकित बांधकाम व्यावसायिक तसेच घरांच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. ओपीसी,पीपीसी तसेच इतर विविध सिमेंट प्रकारांद्वारे गुणवत्ता व विश्वास यांचे अधिष्ठान कायम राखले आहे.हा सन्मान त्यांच्या ३५ वर्षांच्या निर्दोष, समर्पित आणि प्रेरणादायी सेवेला दिलेली योग्य दाद आहे.

# केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचा एनएमएमएसमध्ये दणदणीत यश

**३१ विद्यार्थिनींनी मारली बाजी । गुणवंत मुलींनी उंचावला शाळेचा नावलौकिक**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) मध्ये यंदा घवघवीत यश संपादन केले आहे.

दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन व शिष्यवृत्ती मिळावी या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते. यंदा विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थिनींनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल ३१ विद्यार्थिनीना यश मिळालेले असून, हा निकाल अत्यंत कौतुकास्पद लागला आहे.

प्रांजल वाघमारे हिने १४६ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा झाडे आणि सेजल शिंदे यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. या यशामागे विद्यार्थिनींची जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. जालिंदर सातपुते, जयश्री कोतकर, मेघा पोपळघट, समृद्धी गरड, नितीन गोफणे, प्रतिभा खळेकर यांनी विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन केले.

विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांनी या परीक्षेसाठी विशेष तयारी करुन घेतली होती. नियमित मार्गदर्शन सत्रांमुळे विद्यार्थिनीं उत्तम प्रकारे यश संपादन केले. यावेळी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर म्हणाले की, केडगावच्या शैक्षणिक क्षेत्रात या यशाने नवे पर्व सुरू केले असून, विद्यालयाने पुन्हा एकदा गुणवत्ता सिद्ध केली आहे. योग्य मार्गदर्शन, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते. आर्थिक अडचणी असूनही गुणवत्तेच्या जोरावर मोठे यश मिळवता येत असल्याचे त्यांनी सांगितले. शालेय संस्थेचे पदाधिकारी व पालकांनी गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बीड-कल्याण महामार्गावरील काँक्रीटीकरण निकृष्ट; ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**'टेस्ट ऑडिट' शिवाय बिल अदा करू नये; अन्यथा केंद्रीय मंत्र्यांच्या कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बीड ते कल्याण राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वरील काँक्रीटीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व शासन नियमांना धरून नसल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदार कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केली आहे. यासंदर्भात केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देण्यात आले असून संपूर्ण कामाचे स्वतंत्र 'टेस्ट ऑडिट' करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड ते कल्याण महामार्गावरील काँक्रीटीकरणाचे काम पुणे येथील एका कंपनीकडून सुरू असून कामादरम्यान प्रवाशांसाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देणे बंधनकारक असतानाही तो देण्यात आलेला नाही. त्यामुळे वारंवार अपघात घडत असून अहिल्यानगर व पारनेर तालुक्यातील पोलीस ठाण्यांत सुमारे १०० ते १२५ अकस्मात मृत्यूंची नोंद असल्याचा दावा समितीने केला आहे. या मृत्यूंसाठी संबंधित ठेकेदार जबाबदार असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

गेली एक वर्षे काळेवाडी ते अहिल्यानगर दरम्यान काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. अनेक ठिकाणी काँक्रीटला तडे गेले असून रस्त्यावर 'जंपिंग' होत असल्याने वाहनधारकांना त्रास



सहन करावा लागत आहे. शासन परिपत्रकानुसार २०० एमक्यू क्षमतेचे काम अपेक्षित असताना प्रत्यक्षात कमी दर्जाचे व अपूर्ण काम केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी आवश्यक यंत्रसामग्रीऐवजी मजुरांकडून काम करून दर्जात तडजोड केल्याचेही निवेदनात नमूद आहे.

काम सुरू असतानाही टोल वसुली सुरू ठेवण्यात आल्याने खराब रस्त्यावरून प्रवास करूनही नागरिकांकडून शुल्क आकारले जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. काँक्रीटीकरणासाठी लागणारा मुरूम पारनेर तालुक्यातील जामगाव (गट नं. २८) व कान्हूर पठार व धोत्रे बुद्रुकपरिसरातून मोठ्या प्रमाणात उत्खनन करून घेण्यात आल्याचा आरोप आहे. शासनाकडे भरलेल्या रॉयल्टीपेक्षा अधिक उत्खनन करून महसुलाचे नुकसान केल्याचे निवेदनात म्हटले आहे. काही ठिकाणी परवानगीशिवाय ब्लास्टिंग करून उत्खनन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच मुरूम व क्रश सॅन्ड वाहतूक करणाऱ्या वाहन वाहनांना ईटीपी पासजीपीएसवा आवश्यक परवानग्या नसल्याचा आरोप समितीने केला आहे. संबंधित प्रकरणी महसूल विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील काही अधिकाऱ्यांनी संगनमत केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. ढवळपुरी फाटा येथे उभारण्यात आलेल्या टी.एम.सी./आरएमसी प्लॅन्टसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी नसतानाही प्लॅन्ट सुरू असल्याचा आरोप आहे. त्यामुळे परिसरातील शेतीचे नुकसान व ग्रामस्थांना आरोग्याच्या समस्या उद्भवल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कामावर बालकामगारांचा वापर केल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, साहित्य पुरवठा व वाहतुकीसंदर्भात जीएसटीचा भरणा न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप समितीने केला आहे. सदर सर्व प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून संपूर्ण काँक्रीटीकरणाचे 'टेस्ट ऑडिट' करावे. ऑडिट पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदारास कोणतेही बिल अदा करू नये. तसेच निकृष्ट कामासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी करण्यात आली

# सलग तिसऱ्या दिवशी सोलर पंप वायर चोरी

**मुरमा शिवारातील शेतकरी दहशतीत**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण तालुक्यातील पाचोड पोलीस ठाणे हद्दीतील मुरमा शिवारात सोलर कृषी पंपाच्या वायर चोरीच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. २६ फेब्रुवारी रोजी आठ शेतकऱ्यांच्या शेतातील दहा ते बारा सोलर पंपांच्या सर्विस वायर अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या होत्या. त्यानंतरही चोरीची मालिका कायम असून सलग तिसऱ्या दिवशी पुन्हा अनेक शेतकऱ्यांच्या सोलर पंपांच्या वायर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.

सोलर पंपावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. वायर चोरीमुळे पाणीपुरवठा खंडित झाला असून पिकांच्या नुकसानाची भीती व्यक्त केली जात आहे. सततच्या घटनांमुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, अज्ञात चोरटे





पोलिसांना जणू उघड आव्हान देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

या प्रकरणी पाचोड पोलिसांकडून तपास सुरू असल्याची माहिती मिळाली असून, परिसरात गस्त वाढविण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

**वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादीत अहिल्यानगरच्या संचालकपदी**

# आजिनाथ शिरसाठ, सुनिल गुळमकर, दिनेश निकम, बाबासाहेब भांड यांची बिनविरोध निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादीत अहिल्यानगर या संस्थेची व्यवस्थापक समिती सदस्यांची सभा दि.२४ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्था कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी अध्यासी अधिकारी श्री. के. के. आव्हाड साहेब होते. नैमित्तिक रिक्त झालेल्या ४ सर्वसाधारण जागेकरीता अर्ज दाखल करण्याकरीता असणा-या मुदतीत चारच फॉर्म उपलब्ध झाल्याने श्री. आजिनाथ शिरसाठ श्री. सुनिल गुळमकर श्री. दिनेश निकम श्री. बाबासाहेब भांड यांची बिनविरोध निवड झाल्याचे मा.श्री. के. के. आव्हाड (अध्यासी अधिकारी) यांनी जाहीर केले. यावेळी स्वाभिमानी तांत्रिक मंडळाचे अध्यक्ष श्री. शंकर जारकड उपाध्यक्ष श्री. सुभाष लोखंडे कार्याध्यक्ष श्री. संतोष नेवासकर कोषाध्यक्ष श्री. विक्रम कोके सचिव श्री. प्रशांत ठोंबरे सदस्य श्री. विजय ढवण श्री. नंदकुमार म्हेत्रे श्री. मधुकर पाथरकर श्री. संजय झरेकर श्री. सतिश चोळके श्री. संतोषकुमार कांबळे श्री. गणेश मेहेत्रे व संस्थेचे अध्यक्ष श्री. कुशाबा वायसे व्हा. चेअरमन श्रीमती. सुनिता मेढे सचिव श्री. अशोक मते व संचालक श्री. सतिश भुजबळ श्री. संतोष शेलार श्री. रुपेश चाकणे श्री. संतोष भिंगारदिवे श्री. चंद्रकांत सुरवसे श्री. अरुण भोसले श्री. प्रविण देशमुख संचालिका श्रीमती. उषा मिसाळ हजर होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक श्री. इब्राहीम हवालदार श्री. रघुनाथ लाड इत्यादी उपस्थित होते. संचालक निवडी बाबत तांत्रिक कामगार युनियन (र.नं.५०५९) च्या पदाधिकारी यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# थंडीचा आंबा बागांवर घाला; नुकसान भरपाईची भुमरे यांची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** यंदाच्या असामान्य थंडी व बदलत्या हवामानामुळे राज्यातील आंबा बागांना मोठा फटका बसला असून मोहोर गळतीचे प्रमाण वाढले आहे. परिणामी आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रातील आंबा उत्पादकांना तात्काळ नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास (बापू) संदीपान भुमरे यांनी केली आहे.

आमदार भुमरे यांनी फळोत्पादन मंत्र्यांना देण्यात आलेल्या पत्रात नमूद केले आहे की, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व खानदेश या भागात यंदा आंबा बागांची स्थिती समाधानकारक होती. मात्र डिसेंबरमध्ये वाढलेल्या थंडीमुळे मोहोरावर प्रतिकूल परिणाम झाला. दाट धुके व तापमानातील चढ-उतार यामुळे परागीभवन प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार सुमारे ७० टक्क्यांपर्यंत मोहोर गळून पडला असून अपेक्षित उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. दरवर्षी सहा ते सात टन उत्पादन मिळणाऱ्या बागांत यंदा केवळ एक ते दोन टन उत्पादन मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी भुमरे यांनी केली आहे.

# महिला सशक्तीकरणाची खरी सुरुवात आरोग्यापासून होते –जागृती ओबेरॉय

## सेवाप्रीत सोशल फाउंडेशन व साईदीप सह्याद्री हॉस्पिटलचा संयुक्त उपक्रम; तीन दिवसीय तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या निरोगी आयुष्यासाठी सेवाप्रीत सोशल फाउंडेशन व साईदीप सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात शहरातील महिला तसेच वस्तीगृहातील मुलींच्या विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या.

शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, ग्रुप लीडर सविता चड्डा, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वैशाली किरण, सुशिला मोडक, ग्रुप लीडर अर्चना खंडेलवाल, गीता नय्यर, रितू वधवा, गीता माळवदे, सिमरन वधवा, अन्नू थापर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी सविता चड्डा, डॉली मेहेता, रीटा सलूजा, अनिता शर्मा, वैशाली मालपाणी, आंचल बिंद्रा, अनिता गाडे, डॉली भाटिया, अनुभा ॲबट, सोनिया ॲबट, बीना बत्रा, शारदा बिहानी, कीर्ती बोरा, अपर्णा बोथरा, चैताली बोराटे, दीपा चंगेडिया, संगीता ओबेरॉय, प्रीती सोनवणे, रंजना झिंजे, शीतल कोठारी, विजय सारडा, मनीषा लोढा, रिध्दी मनचंदा, कैलाश मेहेता, मंगला, योजना बोठे, करुणा मुनोत, विजया सारडा, सविता बारमेचा, शिल्पा सबलोक, वैशाली गुगळे, कृष्णा काबरा, कांचन निहलानी, किट्टू गोल, किट्टी मल्होत्रा, साधना बिहानी, उषा धवन, सुनीता गांधी, शिल्पा गांधी, श्वेता गांधी, गीता शर्मा, जान्वी नारंग, मंगल झंवर, रूपा पंजाबी, सुवर्णा गाडेकर आदी उपस्थित होते.

डॉ. वैशाली किरण म्हणाल्या की, ‘‘महिलांनी आपल्या आरोग्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये. शरीरातील प्रत्येक लक्षाकडे लक्ष द्यावे. विशेषतः मधुमेह, थायरॉईड आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग यांसारखे आजार सुरुवातीला लक्षणे न दाखवता वाढतात. नियमित तपासणीमुळे आजारांचे लवकर निदान होऊन उपचार सोपे होतात. प्रत्येक महिलेने वर्षातून किमान एकदा संपूर्ण आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर योग्य आहार घेऊन नियमीत व्यायाम करण्याचे त्यांनी आवाहन केले.

जागृती ओबेरॉय यांनी महिला सशक्तीकरणाची खरी सुरुवात आरोग्यापासून होते. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवणे ही आमची बांधिलकी आहे. अल्प दरात तपासण्या उपलब्ध करून देत महिलांमध्ये आरोग्यजागृती निर्माण करणे हा या शिबिरामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.

सविता चड्डा म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. या शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा महिलांच्या जागरूकतेचा पुरावा आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिराच्या माध्यमातून सुमारे अडीच हजार रुपयांच्या विविध तपासण्या महिलांना अल्प दरात करून देण्यात आल्या होत्या. तसेच वस्तीगृहातील मुलींच्या सर्व तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. महिलांच्या रक्ताच्या विविध तपासण्या, मधुमेह, थायरॉईड, गर्भाशय मुखाचा कर्करोग यांसह मुलींच्या रक्त, कॅल्शियम व आयर्न तपासण्या करण्यात आल्या.

याशिवाय साईदीप सह्याद्री हॉस्पिटलच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वॉकथॉनमध्ये सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या महिला सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली. संपूर्ण तपासण्या डॉ. वैशाली किरण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. व्यंकटेश मुळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवी पेठेतील श्रीराम मंदिरात २ मार्चपासून ३१ दिवसीय श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्याला प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, श्रीराम मंदिर नवी पेठ द्वारा श्रीराम व हनुमान जन्मोत्सवानिमित्त ३१ दिवसीय श्री महा हनुमान चालीसा पाठ व भजन संध्या कार्यक्रमास सोमवार, २ मार्च रोजी रात्री आठ वाजता श्रीराम मंदिर नवी पेठ येथून अत्यंत भक्तीभावाने कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे. तसेच सलग ३१ दिवस संपूर्ण नगर शहरात विविध सार्वजनिक मंडळ व ट्रस्टच्या माध्यमातून सामूहिक महा हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येणार आहेत.

श्री हनुमान चालीसाचे सामूहिक पठण व त्याचा प्रचार हे मुख्य उद्दिष्ट घेऊन गेली १९ वर्षांपासून श्रीराम व हनुमान जन्मोत्सव अतिशय भक्ती भावाने साजरा करण्यात येत आहे. यावर्षी मंडळाने प्रथमच महा हनुमान चालीसा पाठाबरोबर ‘‘श्रीराम जय राम जय जय राम’’ या तारक मंत्राचे संगीतमय सामूहिक जपसुद्धा करण्यात येणार आहे. तसेच या वर्षी श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळा कडून प्रत्येक घरांघरांत व प्रत्येकांच्या मुखातुन श्रीराम स्तुती व हनुमान चालीसा पाठ व्हावे हे उध्दीष्ठ डोळ्या समोर ठेऊन मोफत हनुमान चालीसा पुस्तिका कार्यक्रमादरम्यान वाटप करण्यात येणार आहे.

रोज रात्री कार्यक्रमाच्या शेवटी श्रीरामचरितमानस कथेतील चौपाई घेऊन त्यानंतर श्रीरामजी व हनुमानजी यांची आरती करून प्रसाद वितरण करून कार्यक्रमाचे समापन करण्यात येणार आहे. तरी सर्व शहरवासीयांनी ३१ दिवसीय श्रीराम व हनुमान जन्मोत्सव या धार्मिक व पावन अशा उत्सवात जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष प्रीतम मुथा व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# १ मार्चला शहरात रंगणार राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्याला चालना देण्यासाठी युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशन यांच्या वतीने रविवारी (दि. १ मार्च) शहरात राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा टिळक रोड येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय येथे सकाळी ९ ते १२ या वेळेत पार पडणार आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन असोसिएशनच्या अध्यक्षा हेमलता काळाणे व सर्व सदस्यांनी केले आहे.



ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेव्हल १ ते ५ तसेच वैदिक मॅथ्स या गटांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. सकाळच्या सत्रात सर्व गटांच्या स्पर्धा पार पडतील. गणितातील वेग, अचूकता आणि मानसिक गणनेची क्षमता यांचा कस पाहणारी ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी एक उत्तम व्यासपीठ ठरणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी आत्मविश्वास वाढवून त्यांची बौद्धिक क्षमता अधिक विकसित करण्याचे प्रयत्न केले जाणार आहे.

दुपारच्या सत्रात बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, सौ. दिपालीताई बारस्कर (नगरसेविका, अ.नगर), नगरसेविका संध्याताई पवार, सामाजिक कार्यकर्त्या अ‍ॅड. सौ. उज्वला मुरकुटे, डॉ. हर्षदा मनीष बडे (बी.डी.एस), नगरसेवक निखील वारे, महेश तवले, इक्रा स्कूलचे अध्यक्ष डॉ. शुजाउद्दिन सय्यद तसेच माऊली इंग्लिश मेडिकल स्कूलच्या विद्या संजय उदमले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सर्व गटांतील पहिल्या पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफीसह बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी नॅशनल व इंटरनॅशनल स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# गुरु आनंद तीर्थ, चिचोंडी अक्षय तृतीयाला १००८ वर्षीतप पारणा महोत्सव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गुरु आनंद तीर्थ‘‘ चिचोंडी (शिराल), अहिल्यानगर ‘‘नवकार तीर्थ‘‘ व ‘‘समवसरण तीर्थ‘‘ भव्य अनुष्ठान व तीर्थ द्वारचे उद्घाटन रविवार, १ मार्च २०२६ पावन निश्रा : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदि ठाणा

आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म.सा. यांची जन्मभूमी चिचोंडी (शिराल), जिल्हा, अहिल्यानगर येथे गुरु आनंद फाऊंडेशन द्वारा भव्य गुरु आनंद तीर्थ उभारण्याचे कार्य उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने संपन्न होत आहे.

आनंद तीर्थ येथे मानव सेवा, समाज प्रबोधन, शिक्षण, व्यक्ती–समाज विकास, कल्याणार्थ अनेक प्रयोजनातून येथे ‘‘सप्त तीर्थची‘‘ निर्मिती होत आहे. येथे आतापर्यंत गुरु चरण तीर्थ, साधु भवन साध्वी भवन, भक्त निवास, भोजन शाळा इ. काम पूर्ण झाले आहे. नवकार कलश तीर्थ व गौतमलन्धी कलश, श्रुतपीठ, पुरुषाकार अष्टमंगल ध्यान केंद्र, गर्भ संस्कार केंद्र, संलेखणा केंद्र आदिचे निर्मीती कार्य प्रगतीशील आहे.

या सप्ततीर्थां पैकी नवकार तीर्थ व समवसरण तीर्थचे काम पूर्ण झाले आहे. या दोन्ही तीर्थांचे भव्य अनुष्ठान व तीर्थ द्वाराचे उद्घाटन रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सुरु होणार आहे.

हे अनुष्ठान प.पू. प्रवीणऋषिजी म.सा. स्वतः करणार आहेत. अनुष्ठान साडेतीन तासांचे आहे. स्थानकवासी समाजात प्रथमच होत असलेल्या अद्भुत व ऐतिहासिकअनुष्ठानाचे साक्षीदार होण्यासाठी गुरु आनंद फाऊंडेशन तर्फे गुरुभक्तांना अनुष्ठानात सामील होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या महोत्सवास अर्हम् विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पू. श्री प्रवीणऋषिजी म.सा. आदि ठाणा २, पू. श्री प्रितीदर्शनाजी म.सा. आदि ठाणा ५, मधुरवक्ता डॉ. पू. श्री. प्रणवदर्शनाजी म.सा. आदि ठाणा ४, जिनशासन गौरव पू. श्री. सुनंदाजी म.सा. आदि ठाणा ६ यांचे पावन सान्निध्य लाभणार आहे. संपूर्ण भारतातून गुरु भक्त येथे उपस्थित राहणार आहेत.

नवकार तीर्थ मध्ये अंखडपणे २४ तास नवकार महामंत्राचे उद्घोषण होणार आहे व यातून नवकार महामंत्राच्या शक्तिचे जागर केले जाईल. तसेच समवसरण तीर्थ मध्ये अखंडपणे श्रुतधाराचे पठण केले जाईल या जिनेश्वरीच्या माध्यमातून प्रभू भक्ती केली जाईल,

नवकार तीर्थ निर्माणचा लाभ स्व. सौ. छटाकीबाई बाबूलालजी मुथा यांच्या स्मरणार्थ पुणे येथील उद्योजक श्री. सुभाषजी, प्रशांतजी मुथा या परिवारांनी घेतले आहे. तसेच नवकार तीर्थ अनुष्ठानचा लाभ पुणे येथील उद्योजक श्री. दिपचंदजी, सुनिलजी, सुरजजी पारख यांनी घेतला आहे. नवकार तीर्थ कलश उद्घाटनाचा लाभ पोरुर चेन्नई येथील श्री महावीरचंदजी कांकरिया या परिवाराने घेतला आहे.

समवसरण तीर्थाचा लाभ चेन्नई येथील स्व. नवरतनसा चोरडिया यांच्या स्मरणार्थ श्रीमती कांताबाई, श्री. अजितसा, श्री. भरतसा चोरडिया परिवार यांनी घेतला आहे. समवसरण तीर्थ अनुष्ठानचा लाभ स्व. सौ. पुष्पादेवी माणिकचंदजी दुगड यांच्या स्मरणार्थ पुणे येथील श्री. प्रमोदजी, प्रवीणजी, प्रकाशजी, किर्तीराजजी, श्री. गौरवजी, श्री. तेजसजी, श्री. आकाशजी दुगड परिवारांनी घेतला आहे. तसेच समवसरण तीर्थ कलश द्वार उद्घाटनाचा लाभ अहिल्यानगर निवासी श्रीमती लिलाबाई मोहनलालजी इंगरवाल यांच्या स्मरणार्थ श्री. संतोषजी, श्री. कुणालजी डुंगरवाल परिवार यांनी घेतला आहे.या भव्य अनुष्ठनास आपण सर्व भक्त जणांना सादर आमंत्रण आहे.

# विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे – सौ.ज्योतीताई गाडे

## डोके विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरात निर्मलनगर येथे ज्ञानदीप प्रज्वलित करत, संस्कारांची ज्योत चेतवत आणि गुणवंतांचा गौरव साजरा करत लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यामंदिर व श्री साई माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने अहिल्यानगर शहरातील नवनिर्वाचित महापौर,नगरसेवकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अहिल्यानगर चे महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते नटराज पूजनाने झाले.

‘‘विद्यादान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे,’’ असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षणाच्या पवित्र कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थी व शिक्षक यांच्यामधील अतूट नात्यासंबंधी सविस्तर माहिती त्यांनी सांगितली. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली. संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका श्रीमती शारदाताई ढवण,सौ.रोशनीताई त्र्यंबके, रोहन सानप, भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष श्री बोरुडे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रसाद शिंदे,पोलीस अधिकारी सौ. कल्पना अवसर,अभिषेक खामकर, माजी विद्यार्थी योगेश पिंपळे, अडबंगीनाथ माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गहिनीनाथ गर्जे, सतीश राजगुरु, बजरंग शाळेचे सहशिक्षक मोरे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ‘‘विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असते भविष्यात देखील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्था कायम प्रयत्नशील राहील.’’

१९९९ साली लावलेले या शाळेचे छोटेसे रोप आज ज्ञानाच्या वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेला हा वार्षिक समारंभ सांस्कृतिक कार्यक्रम,गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव गुणवत्तेला प्रेरणा देणारा ठरत आहे. असे त्यांनी सांगितले.

अध्यक्ष बापूसाहेब डोके व सचिव आशाताई डोके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संभाजी पवार, मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती पवार, मंजू नवगिरे, आशा धामणे, संज्योत बर्वे, भारत जगदाळे,सुजाता कर्डिले,राणी राऊत,प्रास्ताविक श्री.सोमनाथ शेलार यांनी केले. सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे तर आभार सुप्रिया वाळके यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसिद्धी करिता – विजय मते फोटो मजकूर – निर्मलनगर येथील डोके विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनात महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले.

# कुतूबखेड्यातील ग्रामसेवक अचानक आवतरल्याने ढोल ताशा वाजवून केले अनोखे स्वागत

## ग्रामसेवक सतत गैरहजर राहत असल्याने ग्रामस्थ त्रस्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** ग्रामसेवक एक नव्हे तर चक्क पाच वर्षाच्या दीर्घकाळानंतर ग्रामपंचायतीत अचानक अवतरल्याचे बघून .आश्चर्यचकित झालेल्या ग्रामस्थांनी मग ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतीषबाजीत आलेल्या ग्रामसेवकाला शाल श्रीफळ देऊन अन् हारतुरे घालून त्यांचे अनोख्या पध्दतीने स्वागत केल्याने या स्वागाताची सद्या सर्वत्र चांगलीच खमंग चर्चा होतांना दिसत आहे. दरम्यान ग्रामसेवकाच्या या प्रकाराने ग्रामस्थ चांगलेच संतप्त झाल्याचे पाहावयास मिळाले.दीर्घ काळानंतर गावात पाय ठेवणा–या ग्रामसेवकाला ग्रामस्थकांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याने त्यांनी काही वेळातच गावातून काढता पाय घेतला..पैठण तालुक्यातील दावरवाडी जवळील कौंदर कुतूबखेडा गावात हा प्रकार घडला.

कौंदर कुतुबखेडा या सयुक्त ग्रामपंचायतीत सात सदस्य आहे.तसेच ग्रामसेवक म्हणून राजीव दिलवाले यांची नेमणूक आहे.परंतु ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, त्यांनी गेल्या पाच वर्षात एकदाही गावात हजेरी लावली नाही. सर्व कामे ही एकतर हाँटेलात बसून किंवा त्यांच्या घरी जाऊन करुन घ्यावी लागायचे.त्यामुळे गावातील गोरगरीबांचे अनेक महत्त्वाची कामे रेंगाळलेली आहे.तसेच ग्रामपंचायतीत एकदाही ग्रामसभा देखील झालेली नाही.झाली ती फक्त कागदोपत्री असाही अरोप ग्रामस्थांनी केला.ग्रामसेवक दिलवाले हे ग्रामपंचायतीच्या निवडणूक प्रभाग रचनेच्या कामानिमित्त गुरुवारी दि,२६ कुतुबखेडा ग्रामपंचायतीत आले होते.गावातील ग्रामस्थांना याची कुणकूण लागली आपल्या गावात ग्रामसेवक कोण आहे.हे बघण्यासाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे धाव घेतली.मग आलेल्या ग्रामसेवकाचे ढोल ताशा वाजवून फटाक्याची आतीषबाजीत शाल श्रीफल हारतूरे घालून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या तरतुदीनुसार ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असतो, त्याची मुख्यालयात नियमित हजेरी आवश्यक आहे. मात्र,कुतबखेडा येथील ग्रामसेवक गावात येत नसल्याने जन्म–मृत्यू नोंदणी, विविध प्रमाणपत्रे, शासकीय योजनांच्या अर्जांची प्रक्रिया, रस्ते व पाणीपुरवठा प्रस्ताव, ग्रामसभेचे आयोजन अशा महत्त्वाच्या कामांचा मोठा खोळंबा झाला आहे. १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीविषयी माहिती ग्रामसभेत ग्रामस्थांना मिळणे आवश्यक आहे..

# कामरगाव जिल्हा परिषद शाळेला भाजप ओबीसी मोर्चाकडून पुस्तकांची भेट

## पुस्तक हेच खरे ज्ञानाचे भांडार – गणेश बनकर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या वतीने कामरगाव (ता. नगर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या वाचनालयासाठी विविध विषयांवरील पुस्तकांची भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती निर्माण व्हावी, त्यांच्यात सकारात्मक विचारसरणी वाढीस लागावी आणि जीवनाला योग्य दिशा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तसेच भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या वेळी भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर यांनी शालेय शिक्षकांकडे पुस्तके सुपूर्द केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष हेमंत साठे यांच्यासह शालेय शिक्षिका बेबी ढेले, सविता तवले आदींसह शिक्षकवृंद, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी महापुरुषांची चरित्रे, महान व्यक्तींच्या आत्मकथा, यशस्वी व्यक्तींच्या जीवनप्रवासावरील पुस्तके तसेच विविध शैक्षणिक व ज्ञानवर्धक साहित्य वाचनालयासाठी देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच वाचनाची गोडी लागून त्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

गणेश बनकर म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात मुलांचा कल मोबाईल आणि इंटरनेटच्या दिशेने अधिक आहे. मात्र पुस्तक हेच खरे ज्ञानाचे भांडार आहे. विद्यार्थ्यांनी चांगली पुस्तके वाचली तर त्यांच्यात विचार करण्याची क्षमता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो. ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून आम्ही ग्रामीण भागातील शाळांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहोत.

हेमंत साठे म्हणाले की, भाजप ओबीसी मोर्चाने आमच्या शाळेच्या वाचनालयासाठी दिलेली पुस्तके ही विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व प्रेरणादायी साहित्य सहज उपलब्ध होत नाही. अशा वेळी या पुस्तकांमुळे त्यांना नवे विचार, नवी प्रेरणा आणि यशस्वी जीवनाची दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

(पान १ वरून)

# जिल्हा प्रधान न्यायाधीशपदी शिवाजी कचरे

कचरे यांनी यापूर्वी विविध जिल्ह्यांत न्यायिक सेवेत काम करताना न्यायनिवाड्यांतील काटेकोरता, प्रशासनातील शिस्त आणि कार्यक्षमता यासाठी लौकिक मिळविला आहे. अकोला येथील कार्यकाळात त्यांनी प्रलंबित प्रकरणांच्या निकाली काढण्यावर भर दिला होता.

अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात सध्या अनेक महत्त्वाची प्रकरणे प्रलंबित असून न्यायालयीन कामकाजात गती येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवीन प्रधान न्यायाधीशांच्या नेतृत्वाखाली जिल्हा न्यायालयाच्या कामकाजात कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढेल, असा विश्वास न्यायवर्तुळातून व्यक्त होत आहे.

# खुनाची प्रकरणे दडपल्याचे उघड झाल्याने एपीआय गितेंवर निलंबनाची टांगती तलवार

उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे पुरावे असूनही गिते यांनी खुनाचा गुन्हा दाखल न करता अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास स्वतःकडे ठेवला होता. जवळपास वर्षभर खुनाचा गुन्हा दाखल झाला नाही. या प्रकरणातही एसपींकडे तक्रार झाल्यानंतर चौकशीचे आदेश देण्यात आले आणि चौकशीतून दत्त यांचा खून झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर गिते यांची राहुरीला बदली करण्यात आली.

अरणगाव पाठोपाठ आता देऊळगाव सिद्धीतील संदीप लगड खून प्रकरणाच्या तपासातही एपीआय गितेंनी अनास्था दाखविल्याचे पुढे आल्याने गिते यांच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्यकाळात नगर तालुका पोलीस ठाण्यात इतरही अनेक गंभीर प्रकार घडल्याची चर्चा असून याबाबतही वरिष्ठांपुढे गा–हाणे गेले असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एपीआय गितेंवर निलंबनाची टांगती तलवार निर्माण झाल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे.